Peer Reviewed Multi-Disciplinary
Annual National Indexed Research Journal
Published as per UGC (India) Guidelines

Impact Factor
5.455
www.sjifactor.com

ISSN 2349-9370
Vol. 7 Issue 2
Jan. 2020
Special Issue

# Research Journal of India

www.researchjournal.net.in www.indiramahavidyalaya.com www.mmcdarwha.org

Special Issue

One Day Interdisciplinary National Conference on

## Recent Trends and Issues in Humanities

Organized by Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha

11 January 2020

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)
In Collaboration with
Principal
MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA
DARWHA, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445 202 (India)

Scanned by TapScanner

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | मान्यवरांचे संदेश, संपादकीय, अनुक्रमणिका | | 3-10 |
| 1 | ROLE OF SAROJINI NAIDU IN INDIAN FREEDOM STRUGGLE | Dr. Pradip P. Yeole | 11-12 |
| 2 | WOMEN'S CONTRIBUTION IN INDIAN HISTORY | Pro. Dr.Bismillah Khan s/o Sarfaraz Khan | 13-14 |
| 3 | भारतीय अर्थव्यवस्था और ग्रामीण विकास | डॉ. अर्चना बी. जैन | 15-19 |
| 4 | आर्थिक मंदी आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा. डॉ. अरुण एन. दसोडे | 20-23 |
| 5 | अकोला जिल्हातील ग्राहकांचा मूलभूत व चैनींच्या वस्तू खरेदी संबंधीत ब्रॅण्ड जागरूकता कलचे अध्ययन | Mr. Chandrakant B. Dhumale Prof. Dr. M. R. Ingle | 24-31 |
| 6 | महाराष्ट्रातील स्त्री–पुरूष प्रमाण असमानता | प्रा.डॉ. गजानन.बी. बनचरे | 32-33 |
| 7 | हिंदवीस्वराज्य स्थापन करण्यात माँ जिजाऊमातेची भूमिका | प्रा.डॉ. सिद्धार्थ शिवजी वाठोरे | 34-35 |
| 8 | भारताच्या निर्माण प्रकियेत मदर टेरेसाचे सामाजिक कार्य | प्रा. डॉ. गणेश पवार | 36-37 |
| 9 | कैसर–ए–हिंद रमाबाई रानडे यांचे भारताच्या इतिहासातील सामाजिक क्षेत्रातील योगदान | डॉ.सौ. ज्योती वसंत खडसे | 38-41 |
| 10 | पार्वतीबाई पटवर्धन यांचे असहकार चळवळीतील योगदान | प्रा.डॉ. आर.यु. हिरे | 42-43 |
| 11 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील सक्रिय महिला : सरोजिनी नायडू | डॉ. दिपक मनीराम चव्हाण | 44-46 |
| 12 | सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा ऐतिहासिक आढावा | डॉ. मनिष कान्हा चव्हाण | 47-49 |
| 13 | स्वातंत्र्यपूर्व काळातील अमरावती जिल्ह्यातील महिलांचे सामाजिक कार्य | डॉ. अमोल र. बोरकर | 50-52 |
| 14 | भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान - (गांधीयुग) | प्रा.डॉ. नंदकिशोर अरुळकर | 53-56 |
| 15 | अमृता शेरगील–आधुनिक महिला चित्रकार | प्रा. ज्ञानेश्वर वारंगे | 57-58 |
| 16 | सावित्रीबाई फुले यांचे समाजसुधारक कार्य | डॉ. संदिप मनोहरराव राऊत | 59-62 |
| 17 | हैदराबाद मुक्तीसंग्रामचळवळीतील महिलांचे योगदान– एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे | 63-66 |
| 18 | १९४२ च्या चलेजाव चळवळीत मेहकर तालुक्याचे योगदान – एक दृष्टिक्षेप | कु. माहेश्वरी विश्वनाथ खरात | 67-69 |
| 19 | श्रीमती विमलाताई देशमुख :– आधुनिक भारताच्या इतिहासातील चिंतनशील व्यक्तिमत्त्व | प्रा. डॉ संदिप विठ्ठलराव भुरले | 70-72 |
| 20 | मौर्य काळातील वासंती या स्त्रीचे सामजिक व राजकीय क्षेत्रातील कार्य | प्रा.डॉ.वाय.एस. माहुरे | 73-74 |
| 21 | भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या पूर्वार्धात स्त्रियांची कामगिरी | प्रा.डॉ. बी.आर. तनपुरे | 75-77 |
| 22 | वाळवंटातील साहित्य चळवळ | प्रा.डॉ. श्रीहरी रंगनाथराव पितळे | 78-80 |
| 23 | भारतीय इतिहास संशोधनात इतिहासकार डॉ. रोमिला थापर यांचे योगदान | प्रा. प्रितम वसंतराव गावंडे | 81-84 |
| 24 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | डॉ.व्ही.आर. तिरपूडे | 85-87 |
| 25 | आधुनिक भारताच्या इतिहासात स्त्रीउन्नती संदर्भात भारतीय स्त्रीसमाज सुधारकांचे कृतीशील योगदान एक ऐतिहासीक अध्ययन | प्रा. डॉ. एन.आर. वर्मा | 88-92 |
| 26 | हिंन्दु धर्मशास्त्रातील स्त्री जीवन | प्रा. डॉ. अनिल ठाकरे | 93-96 |


330

Scanned by TapScanner

Research Journal of India / Vol. 7 / Issue 2 / Jan. 2020 / Special Issue / ISSN 2349-9370
Peer Reviewed National Indexed Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 63

# हैदराबाद मुक्तीसंग्रामचळवळीतील महिलांचे योगदान एक दृष्टिक्षेप

प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे
(इतिहास विभाग प्रमुख)
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय
मेहकर जि बुलडाणा, मो.नं.९८२२५३०१७१

**प्रस्तावना:–**

भारत देश पारतंत्र्यात असताना देशांत ५६३ संस्थाने होती. हैदराबाद संस्थान दक्षिण भारतातील एक मोठे संस्थान होते. हैदराबाद संस्थानची स्थापना मीर कमरूद्दीन उर्फ निजाम उलमुक याने केली. मोगल बादशहा फरूखसियर याने त्याला सन १७१३ मध्ये 'निजाम ' ही उपाधी देवून दक्षिणेचा सुभेदार म्हणून नियुक्त केले. दक्षिण भारतात दाखल झाल्यानंतर मीर कमरूद्दीनने मराठयांमधील दुहीचा फायदा घेवून छत्रपती शाहु व महाराणी ताराबाई यांच्यात भांडणे लावली अगोदरच्या सुभेदाराला जे पाच वर्षात जमले नाही ते त्याने ४ ते ५ महीण्यात करून दाखविले. त्यामुळे बादशाह फरूखसियर याने दक्षिणेत बजावलेल्या कामगिरीबददल 'फतेहजंग' अशी पदवी दिली. निजाम उलमुल्क याचा अर्थ प्रदेशाची व्यवस्था लावणारा तर फतेह म्हणजे विजय व जंग म्हणजे लढाई. प्रत्यक्ष दिल्लीच्या बादशाहाकडून गौरव झाल्यामुळे निजामाचे महत्व वाढले. मुगल बादशाह मुहमदशहां याने निजाम उलमुल्क याला उत्तरेत परत बोलावून मुगल साम्राज्याचा वजीर म्हणून नियुक्त केले. तसेच त्याला 'आसफजहा'असा किताब दिला परंतु निजामाचे मन उत्तरभारताच्या राजकारणात रमले नाही. स्वत: साठी स्वतंत्र राज्य निर्माण त्याचा हेतू होता. त्यासाठी त्याने कुटनितीच्या मार्गाचा अवलंब केला.दक्षिणेचा मुगल सुभेदार मुबारीजखानाला गाफील ठेवून साखरखेर्डा येथे १ ऑक्टोबर १९२४ रोजी झालेल्या युध्दात पराभूत करून दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. सन १७२४ ते १९४८ पर्यंत हैदराबाद संस्थानात कमरूद्दीनच्या आसफीया घराण्यातील सात शासकांनी कारभार पाहीला त्यापैकी मीर उस्मान अली हा शेवटचा निजाम होय.

हैदराबाद संस्थानात निरंकुश राजेशाही अस्तित्वात असतांना इ.स १९४७ मध्ये भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले . स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील इतर संस्थाने भारतीय संघराज्यात सामील झाली. परंतु हैदराबादच्या शासकांने विरोध केला. त्याला हैदराबाद संस्थानातील जनतेने विरोध केला. त्यानुसार मराठवाडयातील प्रत्येक जिल्हयात विरोधक केंद्रे अस्तित्वात आली. त्याचवेळी आपले संस्थान स्वतंत्र्य ठेवण्यासाठी निजामधार्जिण्या संघटणा निर्माण झाल्या त्यात रजाकार म्हणजे स्वखुशीने कार्य करणारे ही संघटना अत्यंत जुलमी व मजबुत होती. कासिम रजवी रजाकार संघटनेचा संस्थापक होता. निजामाच्या दरबारात त्याचे वजन होते म्हणून तो उन्मत बनला. रजाकार संघटनेच्या लोकांकडून हिंदू पुरूष, स्त्रीया, वृध्द व बालके याच्यावर मोठया प्रमाणात अन्याय अत्याचार केले जात होते. लुटालुट , जाळपोळ व स्त्रीयावर बलात्कार इत्यादी घटना रोज घडत .सन. १९४७ –४८ हया एका वर्षाच्या कालखंडात तत्कालीन नोंदीनुसार रजाकार व निजाम सेनेकडून ११५९ स्त्रीयांवर बलात्कार झाले. त्यामुळे हैद्राबाद संस्थानामधील स्त्रीया संतप्त झाल्या. त्यांनी निजामाच्या जुलमी अत्याचारी राजवटीला समाप्त करण्यासाठी आपआपल्या परीने प्रतिकार केला .काही स्त्रीयांनी संघर्ष करून स्वप्राणाचे बलिदान दिले. त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

## १.श्रीमती अशाताई वाघमारे–

हैदराबाद मुक्ती संग्रामातील एक जबरदस्त महिला व्यक्तिमत्व म्हणून हयांना ओळखले जाते. नाशिक जिल्हयातील रहिवाशी पांडुरंग कुलकर्णी हयांच्या त्या कन्या होय. अशाताईचा जन्म इ.स. १९१५ मध्ये झाला. नोकरीच्या निमित्ताने त्या औरंगाबादला आल्या व कायमच्या रहिवाशी झाल्या. शेजारी राहत असलेल्या आनंदराव वाघमारे या तरूणासोबत ओळख झाली आणि ओळखीचे रूपांतर विवाहात झाले. आनंदराव वाघमारे हैदराबाद मुक्तीसंग्रामात काम करीत होते. त्यांना निजाम सरकारने महेबुबनगरच्या जेलमध्ये ठेवले. पतीला भेटण्यासाठी अशाताई जेलमध्ये गेल्या तिथे त्यांना पतीच्या पायात बेडया व कैदयाचे कपडे पाहुन वाईट वाटले. आपल्या पतीवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी पैय्याम, रयत व निजाम विजय या वृत्तपत्राद्वारे प्रयत्न केले. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाचे पडसाद हैदराबाद संस्थानात उमटले सरकारने तुरंगभरतीचा कार्यक्रम हाती

Scanned by TapScanner

घेतला. त्यावेळी आशाताई यांनी तुरंगात गेलेल्या कार्यकर्त्यांच्या घर संसाराला सांभाळण्याचे काम केले. हैदराबाद मुक्ती लढयाला सुरूवात झाल्यानंतर शंस्त्रास्त्राची ने—आण करणे, चिठयाद्वारे निरोप पोहचविणे, जोखमीच्या सामानाची ने—आण करणे या करीता त्यांनी स्वंयमसेवक तयार केले. सरकारची त्यांच्या घरावर कडक नजर होती. झडतीसाठी पोलीस त्यांच्या घरी केंव्हाही येत असत. अशाताई खंबीरपणे त्याला तोंड देत असत. अशाताईनी हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या चळवळीत सक्रियपणे सहभाग घेतल्यामुळे त्यांना चार महिण्याची शिक्षा झाली. त्याठिकाणी कैदयासाठी साक्षरतेचे वर्ग घेतले. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती पत्कारली मुक्ती संग्रामाची सांगता झाली. त्यानंतर अशाताईनी समाजकार्यात स्वत: ला वाहुन घेतले.

२. श्रीमती सुशीलाबाई दिवाण —

हैदराबाद मुक्ती संग्रामाचे उगमस्थान म्हणजे मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हयातील हिप्परगा नावाचे गांव होय. स्वामीरामानंद तिर्थ यांची ती कर्मभुमी सुशीलाबाई येथे काही दिवस राहिल्यानंतर त्या लातुर येथे आल्या व लातुरच्या रहिवाशी झाल्या. श्री राघवेंद्र दिवाण हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या चळवळीत सक्रीयपणे असल्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरूगात जावे लागले. अशावेळी सुशीलाबाई यांनी समर्थपणे घर संसार सांभाळण्याचे काम केले. लातुर परिसरातील स्त्रीयांना एकत्रित आणने , त्यांच्या प्रश्नावर चर्चा करणे , हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाद्वारे नवनवीन कार्यक्रम महिला समोर ठेवणे, निजाम विजय या वृत्तपत्रातुन पुरोगामी लेखन करणे इत्यादी कार्य सुशीलाबाई करीत होत्या. इ.स. १९४५ मध्ये परभणी जिल्हयातील सेलु येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेच्या आधिवेशनाला जोडूनझालेल्या महिला संमेलनाच्या अध्यक्ष्यपदाची जबाबदारी सुशीलाबाई दिवाण यांनी पार पाडली.

३. गीताबाई चारठाणकर —

वयाच्या १२ व्या वर्षी विनायकराव चारठाणकर यांच्या सोबत गीताबाईचा विवाह झाला. विनायकराव वकीलीची परीक्षा उत्तीर्ण झाले होते. परंतु वकीलीचा व्यवसाय न करता हैदराबाद संस्थानामध्ये सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी स्वत: ला झोकुन दिले. त्याबरोबर गीताबाई यांनी सुध्दा पतीच्या बरोबरीने सहभाग घेतला. हैदराबाद मुक्ती लढयात हिरीने सहभागी होणारे हे जोडपे होते. विनायकराव चारठाणकर यांच्यावर पकडवारंट सुटल्यामुळे त्यांना भुमिगत राहवे लागत होते. अशा वेळी गीताबाई यांनी महत्वाची भूमिका निभावली. सत्याग्रहींना मदत करणे, निधि जमविणे, वेश बदलुन विनायकरावांना मदत करणे इ.कामे त्या करीत होत्या. मंठा पोलीस स्टेशनवर हल्ला करण्यासाठी शस्त्रे पुरविण्याचे काम गीताबाईनी निर्भयपणे केले. एक बहादुर स्त्री म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या कामाची पावती म्हणून महाराष्ट्र सरकारने इ.स. १९७७ मध्ये त्यांना 'वीर महिला सुंदराबाई भोपटकर ' पारितोषीक देउन गौरविले .

४. श्रीमती शांताबाई कोटेचा —

शांताबाई कोटेचा यांनी बिड जिल्हयातील मुक्तीसंग्रामातील चळवळीत सहभाग घेतला. खादी प्रचाराच्या माध्यमातुन निधी जमा करणे, पत्रके वाटुन जनजागृतीचे काम करणे इ. कार्य शांताबाई करीत होत्या इ.स.१९४१ मध्ये उमरी येथे झालेल्या अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांनतर लातुर येथे झालेल्या अधिवेशनात त्यांनी जबाबदार राज्यपध्दतीची व स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्याची मागणी केली. तसेच गावोगावी जावून महिलांचे प्रबोधन करण्याचे कार्य केले.

५. डॉ.ताराबाई परांजपे —

सोलापूर येथील आपटे कुटूंबात इ.स. १९३० मध्ये ताराबाईचा जन्म झाला. पुढे हे कुटूंब हैदराबाद संस्थानात स्थलांतरीत झाले. ताराबाई यांच्यावर स्वामी रामानंदतीर्थ, अच्युतराव देशपांडे, गोविंदभाई श्रॉफ यांच्या विचाराचा प्रभाव होता. हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या चळवळीत गटसभा घेऊन निजाम विरोधी प्रचार करणे, निधी गोळा करणे, दिलेल्या मजकुराची पत्रके वाटणे, इ.कार्य त्यांनी केली. तसेच खास तेलंगणातील स्त्रीचा वेश परिधान करून भाउसाहेब वैशंपायन यांच्या घरासमोरील पाहरेकरी पोलीसांची नजर चुकून सायक्लोस्टाईल मशिन आणणे , मुंबईवरून मनमाडला शस्त्रास्त्रे आणणे, हैदराबाद रेडिओ स्टेशन उडवून देण्याची योजना आखने. इत्यादी धाडशी स्वरूपाचे कार्य जीव धोक्यात घालुन डॉ. ताराबाई परांजपे यांनी केली.

६. प्रतिभाताई वैशंपायन—

प्रतिभाताई यांचा जन्म इंदुर येथे १९२३ मध्ये पळनीटकर कुटूंबांत झाला. इ.स. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. त्यातुनच भाउसाहेब वैशंपायन यांच्या देशभक्तीपर कार्याकडे आकर्षित

Scanned by TapScanner

होवून इ.स. १९४३ मध्ये प्रतिभाताई त्यांच्याशी विवाहबद्ध झाल्या. गोविंदभाई श्रॉफ, विनोबाभावे यांच्या सहकार्याने प्रतिभाताई पुण्यातील कर्वेच्या शिक्षण संस्थेत शिक्षणासाठी दाखल झाल्या त्या ठिकाणी आण्णासाहेब कर्वे यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. हैदराबाद मुक्तीसंग्रामात श्री भाउसाहेब वैशंपायन यांच्या बरोबरीने प्रतिभाताईनी काम केले. महिलामध्ये जनजागृतीचे काम करणे .पत्रके वाटणे, भुमिगतांना आश्रय देवून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे.इत्यादी कार्य प्रतिभाताई वैशंपायन यांनी केली . हैदराबादच्या विलिनिकरणानंतर यांनी स्वत: ला सामाजिक कार्यात वाहुन घेतले.

७. श्रीमती दगडाबाई शेळके –

वयाच्या १३ व्या वर्षी दगडाबाईचे लग्न धोपटेश्वर येथील देवराव शेळके यांच्या बरोबर झाले. श्रीमती दगडाबाईचे संसारात मन रमत नव्हते. त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. म्हणून देवराव शेळके यांनी दुसरे लग्न केले. त्यामुळे दगडाबाई यांनी त्यानंतर हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या चळवळीत अधिकाअधिक भाग घेतला. हया निरक्षर महिलेने कोलते टाकळी येथे जावून श्री नारायण गोसावी या व्यक्तीकडून तलवार ,जांबिया , बंदुक, चालविण्याचे प्रशिक्षण घेतले हैदराबाद मुक्ती संग्रामात हया धाडशी महिलेने खांदयावर बंदुक टाकुन सक्रियपणे सहभाग घेतला. रेल्वेचे रूळ उखडणे, पोलीस चौक्या जाळणे , रजाकार संघटनेच्या चौक्या जाळणे , इत्यादी कार्य दगडाबाई पुरूषांच्या बरोबरीने करीत होत्या. कोलते पिपंळगांव कॅम्प मध्ये त्या सक्रियपणे कार्य करीत असत. जंगल सत्याग्राहात सुध्दा त्यांनी भाग घेतला. पोलीस कारवाई झाली त्या प्रसंगी दगडाबाई कन्हेरगांव कॅम्पवर काम करीत होत्या. पोलीस कारवाई दरम्यान घाबरलेल्या जनतेला धीर देणे, लष्करातील अधिकारी व सैनिक यांच्याबरोबर मुस्लीम मोहल्यात फीरून झडत्या घेणे इत्यादी कार्य दगडाबाई शेळके निर्भयपणे करीत होत्या. त्यामुळे हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या समाप्तीनंतर औरंगाबाद येथील क्रांतीचौकातील पुतळयाचे अनावरण दगडाबाई शेळके यांच्या हस्ते झाले.

८. कावेरीताई बोधनकर –

हैदराबाद मुक्तीसंग्रामातील काही महिलांना देशसेवेची प्रेरणा त्यांच्या माहेरच्या वातावरणातच मिळाली. नांदेडचे शामराव , बळवंतराव व जीवनराव बोधनकर हे तीन बंधु मुक्तीसंग्रामाच्या चळवळीत सक्रिय होते. त्यावेळी त्यांची बालविधवा बहिणकावेरी त्यांना मनोभावे मदत करीत होती. एकदा पोलीस मागावर असतांना कावेरीताईनी घरातील शस्त्रास्त्रे शिताफीने इतर ठिकाणी लपविल्यामुळे सुरक्षित राहिली. नांदेडवरून बार्शीला बळवंतराव बोधनकर या बंधुकडे शस्त्रे घेवून जात असतांना त्यांना लातुराला पकडण्यात आले. त्यामुळे एक महिण्याची स्थानबद्धतेंची शिक्षा झाली. तरी सुध्दा सुटकेनंतर कावेरीताईनी मुक्तीसंग्रामाच्या कार्य चालुच ठेवले.

९. श्रीमती राजकुंवरबाई काबरा –

राष्ट्रसेवादलाच्या संस्कारात वाढलेली व राष्ट्रसेवादलाच्या सर्व शाखामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करणारी आघाडीवरील महिला कार्यकर्ती म्हणून राजकुंवरबाई काबरा यांचा उल्लेख केला जातो. हैदराबाद स्वतंत्र्य संग्रामात सशस्त्र क्रांतीला सुरूवात झाल्यानंतर राजकुंवरबाई यांनी शस्त्रास्त्राची जमावाजमव करण्यासाठी कार्य केले. त्या करीता पुणे , कलकत्ता, बिकानेर व जबलपुर येथून येणारी शस्त्रे हैदराबाद राज्याच्या हददीत पोहचविण्याचे काम यांनी केले. पोलीस कारवाई दरम्यान सैनिकांना मदत करणे. जनजागृतीचे काम करणे, लोकांना धीर देणे इत्यादी कार्य राजकुंवर काबरा यांनी केले. हैदराबाद संस्थानाच्या विलिनिकरणानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सुध्दा त्यांनी महत्वाची भुमिका बजाविली.

१०. पानकुंवर फिरोदिया –

पानकुंवर फिरोदिया यांचा जन्म बीड येथे एका जैन कुटुंबात झाला. त्यांचे वडील सुखलालजी कोटेच्या जैन समाजातील एक प्रतिष्ठीत नागरीक व निजामाच्या दरबारी वजन असलेले गृहस्थ होते. बालपणापासूनच पानकुंवरच्या मनावर देशप्रेमाचे व महात्मा गांधीच्या तत्वज्ञानाचे संस्कार झालेले होते . वयाच्या ८ व्या वर्षी त्यांच्या विवाहाची बोलती सुरू झाली तेव्हा त्यांनी ''माझ्या सामाजिक व राजकीय कामाला ज्या कुटूंबात विरोध होणार नाही असा वर शोधा ''असे स्पष्टपणे सांगीतले होते.अहमदनगरचे प्रसिध्द उद्योगपती भाउसाहेब फिरोदिया यांच्या हस्तीमलजी या मुलाबरोबर त्यांचा १९२४ मध्ये विवाह झाला. हैदराबाद मुक्तीसंग्रामामध्ये पानकुंवर हयानी शस्त्रास्त्रे जमविणे, मुक्तीसंग्रामासाठी निधी जमा करणे. निजामाच्या व रजाकारांच्या पाशवी सत्तेला तोंड देण्यासाठी भूमिगत राहून कार्य करण्याचे काम पानकुंवर फिरोदिया हयांनी केले.

330

Scanned by TapScanner

११. वीरपत्नी गोदावरीबाई टेके –

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात होतात्म्य पत्करलेल्या पराक्रमी व्यक्तीच्या नामावलीत गोदावरीबाई टेके यांचे नांव सर्वप्रथम घ्यावे लागेल पती किसनराव टेके व मुलगा माधवराव टेके यांच्या बरोबरीने गोदावरीबाईने पराक्रमाची शर्थ करून मुत्यूला मिठी मारली. इट ता. भूम जि उस्मानाबाद हे गोदावरीबाईचे गांव, पती किसनराव टेके यांचा रजाकाराच्या गुंडाशी लढत असतांनी मुत्यू झाला. पतीच्या हत्येची बातमी समजल्यानंतर हयावीर स्त्रीने पती निधनांचे दुःख बाजुला ठेवून पतीची रायफल हातात घेतली. इतक्यात किसनराव टेकेच्या हत्येने चेकाळलेले रजाकार गोदावरीबाईच्या वाडयावर चालुन आले. त्याना त्यांचा मुलगा माधवराव टेके पाहीजे होता. त्यांनी घराच्या चारही बाजुली वेढा दिला. कासिम रझवीच्या नावाचा जयजयकार होत होता. स्वतः कलेक्टर हैदरी जातीने हजर होता त्याने दरवाजा तोंडण्याचा आदेश दिला. त्यासाठी रजाकार संघटनेचे लोक पुढे सरसावले. परंतु हातात बंदुक घेउन सावधपणे उभ्या असलेल्या गोदावरीबाई यांनी बंदुकीचा नेम धरून एक रोहिला पठाण धाडकण उडविला व पतीच्या हत्येचा बदला घेतला. त्यांनतर त्यांनी गोळीबार सुरूच ठेवला रजाकार सैरावैरा धावत होते. परंतु कलेक्टर हैदरी यांने गोदावरीबाईच्या वाडयाला आग लावण्याचा हुकुम दिला. त्यामध्ये या वीर स्त्रीला रजाकाराशी लढतांना मरण आले.

सारांश :

हैदराबाद निजाम मीर उस्मान अली यांची अत्याचारी राजवट समाप्त करण्याच्या हेतुने हैदराबाद संस्थानातील जनता त्याला विरोध करीत होते. त्यामध्ये वर उल्लेख केलेल्या स्त्रीयांव्यतिरीक्त करूणाताई चौधरी, चंदाताई जरीवाला, तान्हुबाई हंगीरगेकर, प्रमिलाताई कुलकर्णी, गंगुताई देव , गुंजोटीची सोनुताई पाटलीन, शेळगीची त्रिवेणीताई पाटलीन आणि मेहकर येथे किसानदलाच्या सैनिकाबरोबर रजाकांराशी लढत असतांना वीरमरण आलेली अज्ञात महिला इत्यादी सर्व ज्ञात अज्ञात महिलांनी आपली अस्मिता व सत्व जपण्यासाठी पुरूषांच्या बरोबरीने हैदराबाद मुक्तीसंग्रामात सहभाग घेतला. भुमिगत असलेल्या कार्यकर्त्यांनी रात्रीबेरात्री दार ठोठावल्या नंतर त्यांना आश्रय देणे , जेऊ घालणे, वेळीअवेळी पोलीसाकडून घेतल्या जाणाऱ्या झडत्या आणि होणाऱ्या चौकशा याला समोरे जाणे, पत्रके चक्रमुद्राकित करून वितरीत करणे. घरात शस्त्रे लपविणे, त्याची ने आण करणे , पती तुंरूगात असतांना मुलाबाळाना सांभाळणे इत्यादी जोखमीची कामे वरील सर्व स्त्रीयांनी केली त्याच बरोबर प्रसंगी उन्मत बनलेल्या रजाकाराशी लढण्यासाठी हातात बंदुक सुध्दा घेतली .महिलांच्या हया सक्रियसहभागामुळे हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा लढा व्यापक बनला. तसेच लढयातील इतर कार्यकर्त्यांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढला. स्वतंत्र्य प्राप्तीनंतर देशाची धुरा सांभाळणाऱ्या भारत सरकारला सुध्दा हैदराबादेतील जनतेच्या इच्छेकडे लक्ष दयावे लागले. १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय जवानानी हैदराबाद संस्थानाच्या हददीत प्रवेश केला. त्यासमोर निजामाच्या सैन्याचा टिकावा लागला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाचे शासक मीर उस्मान अली हयाने शरणागती पत्कारली. त्याबरोबर हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. थोडक्यात हैदराबाद संस्थानातील जनतेला राजकीय व सामाजिक बंधनातुन मुक्त करण्यासाठी जनतेने सुरू केलेल्या लढयात महिलांनी सुध्दा आपले सत्व व अस्मिता जपण्यासाठी महत्वपुर्ण योगदान दिले.

संदर्भग्रंथ सूची :

१. देशमुख लक्ष्मीकांत व धारूरकर वि.ल., मुक्तीसंग्राम, मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद, सप्टेंबर १९९८.
२. भालेराव अनंत , हैदराबादचा मुक्तीसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन मुंबई, डिसेंबर २०१८.
३. पोतदार वसंत, हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम, विद्याभारती प्रकाशन लातुर, २०१२.
४. फडके य.दी., २० व्या शतकातील महाराष्ट्र, खंड ६ वा , मौज प्रकाशन मुंबई, जुन २०१७.
५. रोडे डॉ. सोमनाथ, मराठवाडयाचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, जुन २०११.

❖❖❖

Smt.Sindhutai Jadhav Maha Mehkar
330
Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

Scanned by TapScanner